■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३४७ ■ रविवार दि.२१ डिसेंबर २०२५ ■ आरएनआय - एमएएचबीआयएल १०५४८ ■ किंमत २ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ BILINGUAL ■ Year - 02 ■ Issue - 347 ■ Sunday Dt. 21 December 2025 ■ TC : MAHBILI 10548 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
Mo.86868 88898
• संपादक : बिलाल शेख •




# बीडमध्ये योगेश क्षीरसागरांना पेठ बीडचा दणका!




## विधानसभेला ते स्वत: पडले तर नगराध्यक्षपदासाठी त्यांचा उमेदवारही पाडला

## त्यांच्या उमेदवाराने घेतलेली नऊ हजारांची लीड याच पेठ बीडपासून तुटली

विश्वनायक न्यूज

**बीड शहरातील पेठ बीडने डॉक्टर योगेश क्षीरसागर यांची राजकीय हवा पूर्णपणे काढून टाकली असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकीत स्वतः क्षीरसागर पराभूत झाले, आणि त्याचबरोबर नगराध्यक्षपदासाठी उभा केलेला त्यांचा उमेदवारही जनतेने नाकारला. विशेष म्हणजे, संपूर्णशहरातून मिळालेल्या सुमारे ९ हजार मतांच्या आघाडीला पेठ बीडनेच सुरुंग लावला. याच भागातून मिळालेल्या कमी मतांमुळे ती लीड अक्षरशः गडगडली, आणि क्षीरसागर गटाचा डाव फसला.पेठ बीडमधील निकालाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, पैशाच्या जोरावर, गटबाजीच्या राजकारणावर आणि जबरदस्तीच्या नेतृत्वावर जनता आता शिक्कामोर्तब करणार नाही. दरम्यान अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार प्रेमलता पारवे या बीडच्या नगराध्यक्ष झाल्या आहेत. मुजीब शेख यांच्याकडे बघून शहरातील विशेषता पेठ बीड परिसरातील मुस्लिम समाजाने त्यांना एक गट्टा मतदान दिले.**





### बीड शहरातील विजयी उमेदवार यादी..

| | |
|---|---|
| **प्रभाग क्र.१ विजयी**<br>बबिता सुधाकर जाधव (तुतारी)<br>अशोक मारोती काळे (तुतारी) | **प्रभाग क्र.१४ विजयी**<br>प्रमोद शिंदे (घड्याळ)<br>आरती बनसोडे (घड्याळ) |
| **प्रभाग क्र. २ विजयी**<br>शुभम दिलीप धूत (कमळ)<br>सावित्री नितीन साखरे (कमळ) | **प्रभाग क्र.१५ विजयी**<br>डॉ.सारिका क्षीरसागर (कमळ)<br>आदित्य माने (कमळ) |
| **प्रभाग क्र.३ विजयी**<br>अमर नाईकवाडे (घड्याळ)<br>रेश्मा सरवदे (घड्याळ) | **प्रभाग क्र.१६ विजयी**<br>मोहम्मद नुझहत आरा शहेबाज (घड्याळ)<br>सय्यद फारुकअली शेख इशाक (घड्याळ) |
| **प्रभाग क्र. ४ विजयी**<br>मीनाताई जाधव (कमळ)<br>भारत कांबळे (तुतारी) | **प्रभाग क्र.१७ विजयी**<br>महेश धांडे (घड्याळ)<br>शेख शबनम बिलाल (घड्याळ) |
| **प्रभाग क्र.५ विजयी**<br>सूरज चुंगडे (धनुष्यबाण)<br>मीना रणजितसिंह चव्हाण (कमळ) | **प्रभाग क्र.१८ विजयी**<br>शेख फरहिन रोहिल (तुतारी)<br>शेख अशपाक शेख इसाक (घड्याळ) |
| **प्रभाग क्र.६ विजयी**<br>मोमिन सीमा परवीन अब्दुल (घड्याळ)<br>जैतुल्ला खान (घड्याळ) | **प्रभाग क्र.१९ विजयी**<br>सय्यद सादिक अली महेबुब (घड्याळ)<br>गोडसे मीना (घड्याळ) |
| **प्रभाग क्र.७ विजयी**<br>भाग्यश्री देशपांडे (कमळ)<br>जगदीश गुरखदे (कमळ) | **प्रभाग क्र.२० विजयी**<br>सय्यद इलियास (पतंग)<br>सय्यद शाहनुरबी (तुतारी) |
| **प्रभाग क्र.८ विजयी**<br>राहुल गुरखुदे (कमळ)<br>मनिषा उल्हास गिराम(मशाल) | **प्रभाग क्र.२१ विजयी**<br>पायल जाधव (घड्याळ)<br>धर्मराज गुंजाळ (घड्याळ) |
| **प्रभाग क्र.९ विजयी**<br>रेखा रणजित पिंगळे (तुतारी)<br>शेख अथ्थर (तुतारी) | **प्रभाग क्र.२२ विजयी**<br>शेख शबनम खय्युम (घड्याळ)<br>शेख निजाम जैनोद्दीन (घड्याळ) |
| **प्रभाग क्र.१० विजयी**<br>मंगेश धोंगडे (कमळ)<br>भाग्यश्री तांबारे (कमळ) | **प्रभाग क्र.२३ विजयी**<br>खुर्शिद आलम शाम मोहम्मद (तुतारी)<br>कुरेशी हिना वाजेद (पंजा) |
| **प्रभाग क्र.११ विजयी**<br>मोमिन खमर निसा शार्फोद्दीन (तुतारी)<br>पठाण अफसर खान करीम खान (तुतारी) | **प्रभाग क्र.२४ विजयी**<br>जोया अनम मोहम्मद मोशिउद्दीन (तुतारी)<br>शेख अफसर शेख मोहम्मद (तुतारी) |
| **प्रभाग क्र.१२ विजयी**<br>सीता भैय्यासाहेब मोरे (घड्याळ)<br>पूजा राजाभाऊ गुजर (कमळ) | **प्रभाग क्र.२५ विजयी**<br>विनोद मुळूक (घड्याळ)<br>ज्योती पिंगळे (कमळ) |
| **प्रभाग क्र.१३ विजयी**<br>समीक्षा शेटे (कमळ)<br>सय्यद मुस्तफा (कमळ) | **प्रभाग क्र.२६ विजयी**<br>शीतल चक्रे (धनुष्यबाण)<br>संजय उडान (धनुष्यबाण) |

## मुस्लिम समाजाने मुजीब शेख यांच्याकडे बघून केले एक गट्टा मतदान

## अजित पवार राष्ट्रवादीच्या प्रेमलता पारवे झाल्या बीडच्या नगराध्यक्षा

राज्यातील नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल आज लागला आहे. यामध्ये बीडची नगरपालिका अत्यंत चुरशीची होणार हे पहिल्यापासूनच समोर आले होते. या ठिकाणी अजित पवार यांची राष्ट्रवादी, भाजपा आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी यांच्यात तिरंगी लढत झाली. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर, तर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी तर भाजपकडून डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी यासाठी ताकद लावली होती. यामध्ये कोण बाजी मारणार याकडे लक्ष लागले होते. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून प्रेमलता पारवे, भाजपकडून डॉक्टर ज्योती घुमरे तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून स्मिता वाघमारे नगराध्यक्ष पदासाठी मैदानात होत्या. मतमोजणी दरम्यान घडी आणि कमळ म्हणजे अजित पवार राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यात जोरदार लढत झाली. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी संपूर्ण ताकद पणाला लावली होती मात्र अखेर त्यांचा उमेदवार पराभूत झालाच. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना खरा दणका बीड शहरातील पेठ बीड विभागाने दिला. सुरुवातीला त्यांच्या उमेदवार डॉक्टर घुमरे या लीडवर होत्या. त्यांची लीड पुढे वाढत गेली आणि ही लीड एका वेळी नऊ हजार पर्यंत गेली. मात्र जसाच पेठ बीड विभागातील मतमोजणीचा पट्टा सुरू झाला तशी त्यांची लीड कमी झाली आणि घड्याळाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांनी आघाडी घेतली. आणि अखेर त्यांचा ३७७९ मतांनी विजय झाला. विशेष म्हणजे आमदारकीच्या निवडणुकीत सुद्धा डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना पेठ बीड विभागातूनच दणका मिळाल्याचे स्पष्ट झाले होते. त्यांनाही आमदार संजय दीक्षित सागर यांच्या विरोधामध्ये सुरुवातीला आघाडी मिळाली होती. ११ ते १२ हजाराची आघाडी मिळाल्यानंतर पेठ बीड परिसर मतमोजणीला सुरुवात झाली आणि त्यांची आघाडी तुटली आणि तिथूनच त्यांच्या पराभवाला सुरुवात झाली. आता नगराध्यक्ष पदाच्या त्यांच्या उमेदवाराच्या बाबतीतही असेच घडले. मुस्लिम समाजाने भाजपला नाकारत घडीला मतदान केले. संपादक मुजीब शेख यांच्या सासूबाई असलेल्या प्रेमलता पारवे यांना समाजाने भरभरून मते दिली ती केवळ मुजीब शेख यांच्यामुळेच.

### क्षीरसागर यांच्या गोटात चिंतेचे वातावरण...

पेठ बीडमधील जनतेने 'दणका' दिल्याने आता विरोधकांना नवे बळ मिळाले असून, जनता तिसऱ्या पर्यायाचा विचार करत असल्याची चर्चा आहे. योगेश क्षीरसागर यांच्यासाठी पेठ बीड भागातील हा विरोध एक धोक्याची घंटा मानला जात आहे. जर हा गड त्यांच्या हातून निसटला, तर आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांचे स्वप्न कठीण होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी वर्तवली आहे. शहराच्या राजकारणात 'पेठ' नेहमीच किंगमेकर ठरली आहे. आता हा दणका योगेश क्षीरसागर कसा पचवतात आणि जनतेचा विश्वास पुन्हा कसा संपादन करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पेठ बीडचा 'फॅक्टर' का ठरला निर्णायक?

स्थानिक प्रश्नांबाबत नाराजी, पेठ बीड भागातील रस्ते, पाणी आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नावरून जनतेमध्ये असलेली सुप्त नाराजी आता उघडपणे समोर आली आहे. आमदारकीच्या निवडणुकीत या भागाने दिलेला कल आणि आता नगराध्यक्ष उमेदवारीसाठी दाखवलेला विरोध, यामुळे या परिसरातील जनता नाराज असल्याचे स्पष्ट दिसते. यापूर्वी डॉक्टर योगेश क्षीरसागर हे सत्य मध्ये होते मात्र त्यावेळी त्यांनी या भागाला केवळ गृहीत धरले. शिवाय निवडणूक जवळ येताच जनतेला विश्वासात न घेता स्वतः निर्णय घेतला आणि पायावर दगड मारून घेतला.

# पिक पाहणी शेतकऱ्यांच्या हिताची २१ डिसेंबरपासून रब्बीची ई पीक पाहणी करा : प्रा.बबनराव आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (डी.सी.एस) अ ग्रीस्टॅग आणि फार्मर आयडी या शासकीय उपक्रमाची मोठी लगबग सुरू झाली असून ही मोहीम केवळ कागदोपत्रीच मर्यादित न राहता थेट शेतकऱ्यांच्या हिताशी जोडलेली असल्याचे स्पष्ट होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागा मार्फत ग्रीस्टॅग संकल्पने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या ई-पीक पाहणी या मोहिमेमुळे भविष्यातील पीक विमा अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत, नुकसान भरपाई, आणि विविध कृषी योजना थेट पिकाच्या नोंदीशी संलग्न होणार आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन शेतकऱ्यांना वेळेवर बी- बियाणे खते अनुदान योजना आणि पीक विम्याचा लाभ मिळावा यासाठी सातत्याने दक्ष राहून काम करीत आहे. विविध आराखड्याचा आढावा क्षेत्रीय पाहणी आणि अधिकाऱ्यांशी नियमित समन्वय साधत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकरी केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.



राज्य शासनाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये ई-पिकपाहाणी डिजिटल क्रॉपसर्वे (डी.सी.एस) मोबाईल पच्या माध्यमातून राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार ई-पिक पाहणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शेतकरी स्तरावर तसेच सहाय्यक स्तरावर स्वतंत्र कालावधी निश्चित करण्यात आला आहे शासन निर्देशानुसार शेतकरी स्तरावरील पीक पाहणीसाठी कालावधी दिनांक २१ डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत शेतकऱ्यांनी स्वतः किंवा सहाय्यक यंत्रणेच्या मदतीने आपल्या पिकाची अचूक नोंदणी करणे अपेक्षित आहे. त्यानंतर सहाय्यक स्तरावरील म्हणजेच महसूल कृषी अधिकारी आणि ग्राम विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कालावधी दिनांक २५ जानेवारी २०२६ ते २० मार्च २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत १००% ई-पिक पाहणी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच सर्व तहसीलदार यांनी संयुक्तपणे आढावा घेतला. राज्यात एकूण झालेल्या ई-पिक पाहाणीचा विचार करता बीड जिल्ह्याचा सध्या १४ वा क्रमांक असून हा क्रमांक अधिक सुधारण्यासाठी महसूल विभाग पूर्ण क्षमतेने काम करीत आहे. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणे अत्यंत आवश्यक असून भविष्यातील सर्व शासकीय लाभ थेट फार्मर आयडी आणि ईपीक पाहणी जोडले जाणार आहेत ही बाब लक्षात घेऊन तहसीलदार साहेब यांनी स्पष्ट आदेश काढत महसूल यंत्रणेला अधिक सक्रिय करण्याचे निर्देश दिले. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्राम महसूल सेवक, यांनी गावोगावी प्रत्यक्ष फिरून ई-पिकपाहणी पूर्ण करावी असे आदेश देण्यात आले आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी आव्हानही केले आहे की ई-पिकपाहणी ही केवळ सरकारी औपचारिकता नसून शेतकऱ्यांच्या हक्काचे संरक्षण करणारी प्रक्रिया आहे.

अचूक पीक नोंद झाल्यास दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना मदत वेळेवर मिळू शकते त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी आणि फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी अप्पर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की शासनाच्या सर्व कृषी योजना अनुदान आणि विमा भविष्यात पूर्णपणे डिजिटल प्रणालीवर आधारित असणार आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतीही शंका न बाळगता महसूल यंत्रणेला सहकार्य करावे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी क्षेत्रीय पातळीवर काम वेगाने सुरू केले असून उर्वरित प्रकरणे ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण केली जातील अशी माहिती दिली आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार साहेबांनी शेतकऱ्यांना थेट शब्दात सांगितले की ई-पिक पाहणी ही शेतकऱ्यांच्या हिताची आहे. आज थोडा वेळ दिल्यास उद्या मोठा फायदा होईल महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच गावोगावी फिरत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी सहकार्य करावे आणि ग्रीस्टॅग प्रकल्पांतर्गत फार्मर आयडी काढून घ्यावा शासन प्रशासन आणि शेतकरी या तिघांच्या समन्वयातून च ही मोहीम यशस्वी होणार असून डिजिटल पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे भवितव्य अधिक सुरक्षित करण्याचा हा प्रयत्न असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यात दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ई-पीक पाहाणी लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# लिंबागणेश वाणीवस्तीवर बिबट्याचा धडक हल्ला

## शेळी ठार, परिसरात भीतीचे वातावरण : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील वाणीवस्ती परिसरात मध्यरात्री बिबट्याने घुसखोरी करत बाबुराव वाणी यांच्या गोठ्यातील एका शेळीवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण वाणीवस्ती तसेच आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. घटनेचा सविस्तर तपशील असा की, वाणीवस्ती येथील बाबुराव वाणी यांचे एकत्रित कुटुंब असून घरासमोर असलेल्या गोठ्यात गायी, म्हशी आणि शेळ्या बांधलेल्या होत्या. मध्यरात्री सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास गोठ्यात जनावरांची धडपड सुरू झाल्याने बाबुराव वाणी यांना जाग आली. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता काही जनावर पळताना दिसले.**




बॅटरीच्या प्रकाशात पाहणी करत असताना एका शेळीचा नरडा तोडलेला असून मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले दिसले. याचवेळी बॅटरीच्या प्रकाशात समोरच बिबट्या उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रकाश पडताच बिबट्या तात्काळ पळून गेला. या घटनेनंतर वाणीवस्ती व परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा वावर असल्याच्या भीतीने अनेक ग्रामस्थांनी रात्र जागून काढली. लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांमध्ये विशेषतः भीती असून नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना अयोध्या वाणी म्हणाल्या, आम्ही शेतात राहतो. आमच्या अंगणात लहान मुले खेळत असतात. कुटुंबातील पुरुष कामानिमित्त बाहेर जातात. रात्री बिबट्याने शेळी ठार केल्यामुळे आम्हाला मोठी भीती वाटत आहे. वनविभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा.

दरम्यान, वनविभागाने पिंजरे लावून तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. गेल्या आठवड्यात लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्यामुळे डॉ. ढवळे यांच्या मागणीनुसार वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन जनजागृती केली होती. डॉ. ढवळे यांनी पुढे सांगितले की, परिसरात ड्रोनद्वारे शोध मोहीम राबवावी, पिंजरे लावावेत, तसेच गस्त वाढवावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी वनविभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून सुरक्षिततेची हमी द्यावी.

# कर्तव्यावर असताना तरुण पोलिस सुदाम राजू पोकळे यांचा अपघाती मृत्यू

## चिंचाळा गावावर शोककळा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील चिंचाळा गावचे सुपुत्र, तरुण पोलिस कर्मचारी सुदाम राजकुमार पोकळे यांचे कर्तव्य बजावत असताना दुर्दैवी अपघातात निधन झाले. गुरुवारी रात्री अहिल्यानगर जिल्ह्यातील राशीन चौकी परिसरात गस्त घालत असताना एका भरधाव वाहनाने धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात सुदाम पोकळे यांचा जागीच मृत्यू झाला. सुदाम पोकळे हे शेतकरी कुटुंबातील असून कुटुंबाचा मुख्य आधार होते. त्यांच्या अकाली जाण्याने पोकळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण चिंचाळा गाव शोकसागरात बुडाले आहे.



कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक, मनमिळावू व सर्वांशी आपुलकीने वागणारा तरुण म्हणून सुदाम पोकळे यांची ओळख होती. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटणाऱ्या या शूर पोलिस कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असतानाच आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चिंचाळा गावासह आष्टी तालुक्यात शोककळा पसरली. अनेक नागरिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या.

सुदाम पोकळे हे यापूर्वी अंभोरा पोलीस स्टेशन येथे अनेक वर्षे कार्यरत होते. काही दिवसांपूर्वीच त्यांची कर्जत पोलीस स्टेशन येथे बदली झाली होती. नव्या ठिकाणी कर्तव्य बजावत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२.३० वाजता चिंचाळा येथील त्यांच्या शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिस दलाच्या वतीने हवेत गोळ्या झाडून मानवंदना देण्यात आली. अंत्यसंस्काराला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह पोलिस खात्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात वडील, आई, भाऊ, पत्नी व मुलगी असा मोठा परिवार आहे. कर्तव्यावर असताना प्राण गमावलेल्या सुदाम पोकळे यांना पोलीस खात्यासह संपूर्ण परिसरातून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे असह्य दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# गाढव खाणार नाही ज्वारी हे माणसाला खाऊ घालत आहे सरकार : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारने गरीब आणि जरूरतम लोकांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम (छ्त्रड्ड-)२०१३ लागू केले आहे. त्यात गहू तांदूळ ज्वारी या धान्याचा समावेश असून हे धान्य सार्वजनिक वितरण प्रणाली (झऊड) अंतर्गत मिळते. पण सध्या महाराष्ट्रात गहू ऐवजी ज्वारी वाटप होत असून, गाढव पण खाणार नाही अशी ज्वारी माणसाला खाऊ घालण्याचे काम हे महाराष्ट्र सरकार करीत आहे. कधी कधी तर हे धान्य सुद्धा कोपन धारकाकडून वाटप होत नाही आणि याची दखल पुरवठा विभाग घेत नसल्याचे दिसून येत आहे. हे माल कोण हजम करीत आहे, त्याची चौकशी झाली पाहिजे. व संबंधित अधिकारी किंवा दुकानदारावर कारवाई झाली पाहिजे. पण असे होत नाही. यासाठी जिम्मेदार कोणाला ठरवावे.



काही महिन्यापूर्वी शिवसेना आमदार (शिंदे गट) संजय गायकवाड यांनी विधानसभेतील निवासस्थानातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला भाजी चांगली झाली नाही म्हणून त्याला बुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राजकीय वर्तुळास चर्चेचा विषय पण झाला, अख्ख्या महाराष्ट्राने हे पाहिले. पण सध्या स्वस्त धान्य दुकानात जनावरे खाणार नाही अशी ज्वारी वाटप होत असून, जनतेने कोणाला मारावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यासंदर्भात कोणीही आवाज का उठवीत नाही हे जनतेसमोर पडलेला खूप मोठा प्रश्न आहे. यासाठी प्रशासनाने धान्याची गुणवत्ता तपासण्यासाठी कठोर नियम बनवावे. तसेच धान्य वितरण प्रणाली मध्ये पारदर्शकता आणावी. आणि गोरगरीब लोकांना धान्य मिळत आहे का, हे पाहण्यासाठी नियमित सर्वेक्षण करावे.आणि धान्य वितरण प्रणालीमध्ये भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी, ही जनतेची अपेक्षा आहे.

# चौसाळ्याच्या आठवडी बाजारातून १९ जणांचे मोबाईल चोरीला

## चौसाळ्याच्या ठाणे अंमलदाराचा कारभार पैसा फेको तमाशा देखो

**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा येथील आठवडी बाजारात बुधवार, दिनांक १७ डिसेंबर रोजी मोठ्या प्रमाणावर मोबाईल चोरीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. एकाच दिवशी जवळपास १९ जणांचे मोबाईल फोन चोरीस गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात मोबाईल चोरी होण्याची ही चौसाळा शहरातील पहिलीच घटना असून यामुळे पोलिसांच्या समोर चोरांनी एक प्रकारे आव्हानच उभे केले आहे. चौसाळा पोलिस चौकीतील ठाणे अमलदाराचा कारभार हा पैसा फेको तमाशा देखो अशा पध्दतीने सुरु असुन तक्रार दाराना देखील खुलेआमपणे पेसाची मागणी ठाणे अमलदार करत आहे अशी चर्चा होत असुन तात्काळ या ठाणे अमलदाराची बदली करण्यात यावी अशी मागणी होत आहे. या चोरीच्या घटनांमध्ये हिंगणी खुर्द येथील माजी सरपंच रमेश तांदळे यांचा सुमारे १५ हजार रुपये किमतीचा, दोन महिन्यांपूर्वी खरेदी केलेला मोबाईल चोरीस गेला आहे. तसेच चौसाळा येथील रामकृष्ण मेडिकलचे संचालक निशिकांत देशमुख यांचा सुमारे ४० हजार रुपये किमतीचा, दोन महिन्यांपूर्वीच घेतलेला मोबाईलही चोरट्यांनी लंपास केला आहे. याशिवाय चांदशी दवाखान्याचे डॉक्टर हलदार यांच्यासह अनेक नागरिकांचे मोबाईल चोरीस गेल्याची घटना चौसाळा येथील आठवडी बाजारात घडली आहे. या प्रकरणी काही नागरिकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून उर्वरित नागरिक तक्रार देण्याच्या तयारीत आहेत. एकाच दिवशी मोठ्या संख्येने मोबाईल चोरीस गेल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. आठवडी बाजारात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांकडून पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी होत आहे. तसेच चोरीला गेलेले मोबाईल शोधून द्यावेत अशी मागणी करण्यात येत आहे.

# एसबीआय ग्राहक सेवा केंद्राचे शटर तोडून सव्वा लाखाची रोकड लंपास

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरात चोरीची एक मोठी घटना समोर आली असून अज्ञात चोरट्यांनी एका ग्राहक सेवा केंद्राला लक्ष्य केले आहे. हनुमान चौक परिसरातील माणिक नगर भागात असलेल्या एसबीआय ग्राहक सेवा केंद्राचे शटर तोडून चोरट्यांनी १ लाख १४ हजार ३०० रुपयांची रोकड लंपास केली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, कन्हेरवाडी येथील रहिवासी वैभव बाळू रोडे (वय २६ वर्षे) हे हनुमान चौक परिसरात एसबीआयचे ग्राहक सेवा केंद्र चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. १८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे केंद्र बंद केले होते. दिवसभराच्या व्यवहारातील १ लाख १४ हजार ३०० रुपयांची रोख रक्कम त्यांनी टेबलच्या ड्रॉवरमध्ये सुरक्षित ठेवली होती. मात्र, १९ डिसेंबरच्या सकाळी सात वाजेच्या सुमारास शेजारील दुकानदार नामदेव मुंडे यांनी वैभव यांना फोन करून त्यांच्या दुकानाचे शटर उघडे असल्याचे आणि चोरी झाल्याचा संशय असल्याचे कळवले.

वैभव रोडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली असता, दुकानाच्या शटरचे कुलूप तुटलेले आढळले. टेबलचा ड्रॉवर उघडा होता आणि त्यातील सर्व रोकड गायब होती. या प्रकरणी वैभव रोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंबाजोगाईत थंडीचा कडाका वाढला: तापमानाचा पारा १२ अंशांपर्यंत खाली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरासह परिसरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर मोठ्या प्रमाणात वाढला असून संपूर्ण तालुका गारठला आहे. डिसेंबर महिन्याच्या उत्तरार्धात तापमानात मोठी घट झाल्याने नागरिकांना हुडहुडी भरली असून जनजीवनावर याचा परिणाम जाणवू लागला आहे. आज अंबाजोगाईचे किमान तापमान १२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले असून हवेतील गारवा कमालीचा वाढला आहे.

शहरात पहाटेपासूनच धुक्याची चादर पाहायला मिळत असून सकाळी उशिरापर्यंत थंडीचा प्रभाव कायम राहत आहे. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी नागरिक उबदार कपड्यांचा आधार घेत आहेत, तर ग्रामीण भागात ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या आरोग्यावर या बदलत्या हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने आरोग्य विभागाकडून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, येत्या दोन ते तीन दिवसांत तापमानाचा पारा आणखी खाली जाण्याची दाट शक्यता आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे थंडीची ही लाट अधिक तीव्र होणार असून नागरिकांनी उबदार कपड्यांचा वापर वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील काही दिवस अंबाजोगाईकरांना कडाक्याच्या थंडीचा सामना करावा लागणार आहे.

# अंबाजोगाईत बिबट्याची दहशत! दगडवाडी–डोंगर पिंपळा शिवारात शेतकरी धास्तावले; वनविभागाने पिंजरा लावण्याची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांनंतर आता बीड जिल्ह्यातही बिबट्याचा थरार पाहायला मिळत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील दगडवाडी आणि डोंगर पिंपळा शिवारात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने या बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**शेतीची कामे ठप्प, पशुपालक चिंतेत**

दगडवाडी आणि डोंगर पिंपळा हा भाग डोंगराळ असल्याने येथे बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळत आहे. काही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बिबट्याचे दर्शन झाले असून, शेतात वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसेही आढळून आले आहेत.



यामुळे शेतात खुरपणी, कापणी किंवा पाणी भरण्यासाठी जाण्यास शेतकरी घाबरत आहेत. विशेषतः पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी शेतात जाणे आता जिवावर बेतणारे ठरू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

**पाळीव प्राण्यांवर हल्ल्याची भीती**

शेतकऱ्यांच्या गोठ्यातील गायी, म्हशी आणि शेळ्यांवर बिबट्या हल्ला करण्याची शक्यता असल्याने पशुपालक रात्रभर जागून आपल्या जनावरांचे रक्षण करत आहेत. यापूर्वी राज्याच्या इतर भागात बिबट्याने मानवी वस्त्यांमध्ये शिरून हल्ले केल्याच्या घटना ताज्या असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे सावट आहे.

**वन विभागाकडे पिंजऱ्याची मागणी**

परिसरातील शेतकऱ्यांनी आणि ग्रामपंचायतीने वन विभागाकडे या घटनेची माहिती दिली आहे. प्रशासनाने केवळ पाहणी न करता तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

# उस प्रश्नावर उपसभापती मोरे यांची यशवंत गुळ युनिटला सदिच्छा भेट

## संपुर्ण उस गाळप करण्याचे शेतकी अधिकारी गोंडे यांचे आश्वासन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव शिवारात असलेल्या यशवंत गुळ युनिटला भावी जि. प. सदस्य तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी सदिच्छा भेट दिली असता उस प्रश्नावर कारखाना प्रशासनाशी चर्चा केली. यावेळी यशवंत गुळ युनिट कार्यक्षेत्रातील संपुर्ण उस गाळप करणार असल्याचे आश्वासन शेतकी अधिकारी श्री. गोंडे यांनी दिले.



आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भावी सदस्यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भावी सदस्यांकडुन मतदारांच्या विवीध समस्या, अडचणी जाणुन घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या उस गाळपाचा हंगाम जोरदार सुरू असुन उस उत्पादक शेतकऱ्यांना काही अडचणी आहेत का ? याची चौकशी करत मालीपारगाव शिवारात असलेल्या यशवंत गुळ युनिटला भावी जि. प. सदस्य तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी भेट देत कारखाना प्रशासनाशी याबाबत चर्चा केली असता सकारात्मक पकार्यक्षेत्रातील संपुर्ण शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप करणार असल्याचे आश्वासन शेतकी अधिकारी श्री. गोंडे यांनी दिले. यावेळी श्रीहरी मोरे यांचा कारखान्याच्या शाल, श्रीफळ देउन सत्कार करण्यात आला. त्यांचेसमवेत भिमराव आप्पा टाकणखार, शिवाजी वाघळे, वैभव खोत, जयराम कांबळे यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय गणित दिन : अंकांच्या भाषेतून विश्व उलगडणारा भारत – रामानुजनांची अमर देणगी

२२ डिसेंबर हा दिवस भारतासाठी केवळ एका विषयाचा उत्सव नसून बौद्धिक परंपरेचा गौरव करणारा दिवस आहे. या दिवशी भारतात राष्ट्रीय गणित दिन साजरा केला जातो. हा दिवस जगप्रसिद्ध भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीचा आहे. अंकांशी मैत्री करणारा, सूत्रांमध्ये सौंदर्य शोधणारा आणि गणिताला अध्यात्माची उंची देणारा हा महामानव भारताच्या वैचारिक इतिहासातील तेजस्वी दीपस्तंभ आहे.

गणित म्हणजे केवळ आकडेमोड नव्हे. गणित म्हणजे विचारांची शिस्त, तर्काची धार आणि निर्णयक्षमतेचा पाया. जिथे मोजमाप आहे तिथे गणित आहे. शेतातील पेरणीचे अंतर, खतांचे प्रमाण, बाजारात ठरवला जाणारा भाव, घरातील खर्चाचे नियोजन, बँकेतील व्यवहार, मोबाईलवरील डिजिटल पेमेंट–सर्वत्र गणित सतत सोबत असते. म्हणूनच गणित हा विषय शाळेपुरता मर्यादित नसून तो जीवनाचा अविभाज्य भाग आहे. राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयीची भीती दूर करणे, गणिताची उपयुक्तता समजावून सांगणे आणि भारतीय गणितीय परंपरेचा अभिमान निर्माण करणे हा आहे. अनेकदा गणित कठीण वाटते, पण भीतीमुळेच ते कठीण होते. योग्य पद्धतीने, जीवनाशी जोडून आणि समजून शिकवल्यास गणित हा आनंदाचा विषय ठरू शकतो.




१८८७ साली तामिळनाडूतील एका साध्या कुटुंबात जन्मलेले श्रीनिवास रामानुजन हे प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गणिताच्या शिखरावर पोहोचलेले अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. ना पुरेशा शैक्षणिक सुविधा, ना आर्थिक पाठबळ–तरीही त्यांच्या बुद्धीने जगाला थक्क केले. संख्या सिद्धांत, अनंत श्रेणी, विभाजन सिद्धांत, पाय या संख्येशी संबंधित सूत्रे यांसारख्या क्षेत्रांत त्यांनी केलेले योगदान आजही आधुनिक गणिताचा पाया मानले जाते. रामानुजन म्हणत की गणित माझ्यासाठी अभ्यास नाही, ते माझे ध्यान आहे. त्यांना गणितीय कल्पना स्वप्नात स्फुरायच्या आणि त्या त्यांनी कागदावर उतरवल्या. केंब्रिज विद्यापीठात प्रा. हार्डी यांच्या सहवासात केलेले त्यांचे संशोधन आजही जगभर अभ्यासले जाते.

रामानुजन हे भारतीय गणित परंपरेतील एक तेजस्वी पर्व असले तरी भारताची गणितीय वाटचाल हजारो वर्षांची आहे. शून्याची संकल्पना जगाला देणारा देश म्हणजे भारत. आर्यभट्ट, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, महावीराचार्य यांसारख्या विद्वानांनी खगोलशास्त्र, बीजगणित आणि त्रिकोणमिती या क्षेत्रांत अमूल्य योगदान दिले. आज जग ज्या दशमान पद्धतीचा वापर करते, तिची मुळे भारतीय ज्ञानपरंपरेत आहेत. आजच्या डिजिटल युगात गणिताचे महत्त्व अधिकच वाढले आहे. संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा, अंतराळ संशोधन, आर्थिक नियोजन–या सर्व क्षेत्रांचा कणा म्हणजे गणित. राष्ट्राची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, संरक्षण व्यवस्था आणि वैज्ञानिक प्रगती या सगळ्यांमागे गणिताची विचारशक्ती कार्यरत असते. ज्या राष्ट्राची गणिती समज भक्कम, त्या राष्ट्राची प्रगती निश्चित असते.

राष्ट्रीय गणित दिन हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षणाची संधी देतो. आपण गणिताला घाबरतो की समजून घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारण्याचा हा दिवस आहे. गणित म्हणजे केवळ गुण मिळवण्यासाठीचा विषय नाही, तर जीवन समजून घेण्याचे साधन आहे. अंक बोलतात, सूत्र मार्ग दाखवतात आणि गणित विचारांना पंख देते. २२ डिसेंबर–राष्ट्रीय गणित दिन–हा दिवस श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा, भारतीय बुद्धिमत्तेचा गौरव करण्याचा आणि भावी पिढीला विचारशील बनवण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. गणित शिका, गणित समजा आणि गणिताशी मैत्री करा–कारण अंक समजले तर भविष्य उजळते.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com